# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
गडचिरोली दि. ०८/१२/२०१७

## *गडचिरोली पोलीसांची नक्षल पिडीतांना आर्थिक मदत*

माओवादयांच्या विरोधात एका पाठोमाग एक धडक कारवाई करत असताना दुसरीकडे गडचिरोली पोलीस जनसामान्यांच्या दु:खावर फुंकर घालण्याचे काम देखील तेवढयाच तत्परतेने करत आहेत. कायदा व सुव्यवस्थेचे काम चोखपणे बजावतानाच जनसामान्याच्या समस्या जाणुन घेण्यासाठी काल दिनांक ०७/१२/२०१७ रोजी मा. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपूर श्री. अंकुश शिंदे साो., मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी साो., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, कारवाफा डॉ. बसवराज शिवपुजे साो. यांनी नक्षलपिडीत मौजा झाडापापडा, ता. धानोरा येथे भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी 'पोलीसांचा खबरी' केवळ या संशयाने माओवादयांनी दिनांक २१/११/२०१७ रोजी झाडापापडा कोंबडा बाजार येथे क्रुरतेने गोळया घालून हत्या केलेल्या सुनिल पवार, वय-४५ वर्ष, रा. झाडापापडा, ता. धानोरा यांच्या कुटुंबियांची भेट घेवून सांत्वना केली. यावेळी मृत सुनिल पवार यांच्या कुटुंबियांना रुपये २ लाख चा धनादेश मा. अंकुश शिंदे साो. यांच्या हस्ते सुपुर्द केला. तसेच त्याच हल्ल्यामध्ये जखमी असलेले सदाराम ठाकुर, वय-५८ वर्ष, रा. झाडापापडा, ता. धानोरा व रविंद्र बुधराम, वय-३५, रा. बोटेहुर, ता. धानोरा यांच्या कुटुंबियांशी देखील संवाद साधुन त्यांना आर्थिक मदत दिली. उपस्थित गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. माओवादयांच्या या क्रुर व भ्याड हल्ल्याचा मा. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपूर श्री. अंकुश शिंदे साो. यांनी निषेध करून उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.



